# प्रेसनोट दि. २५/०४/२०१९

## खुना प्रयत्नाच्या गुन्हयांतील १ वर्षापासुन फरारी असलेला आरोपीस युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----ooo----------ooo----------ooo----------ooo-----

दि.१४/०६/२०१८ रोजी ०५/३० वा.चे सुमारास ओंकार शिवप्रसाद साळुंके, रा. नानापेठ लोकेतालीम जवळ, पुणे यास सुरज ठोंबरे, कुणाल पिसाळ, सुरज गायकवाड असे सुमारे १५ ते २० जणांनी कोयत्याने मारहाण करुन, जिवे मारणाचा प्रयत्न केलेबाबत समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ११०/२०१८ भादवि कलम ३०७, १४३, १४७, १४८, १४९ मु.पो.ॲक्ट क ३७(१)(३)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यापैकी काही आरोपी दाखल गुन्हयांत अटक करण्यात आले होते सदर गुन्ह्यात सुरज गायकवाड रा. लोहीयानगर हा गुन्हा दाखल झाले पासुन सुमारे १ वर्षापासुन फरार होता.

युनिट -१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील अधिकारी व कर्मचारी समर्थ पोलीस ठाणेचे हद्दीत पेट्रोलिंग करिता असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमीदारामार्फत मिळाली की सदर गुन्हयांत १ वर्षापासुन फरारी असलेला आरोपी नामे सुरज गायकवाड, रा. लोहियानगर, पुणे हा लहुजी वस्ताद तालीम समोरील रोडवर उभा आहे अशी खात्रीशीर माहिती मिळावल्याने त्या बाबत मा. पोलीस निरीक्षक सो. श्री. अरुण वायकर यांना माहिती देवुन वरिष्ठांचे परवानगीने युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडील स्टाफसह बातमी प्रमाणे जावुन नमुद आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव सुरज सचिन गायकवाड, रा. लोहियानगर, पुणे असे असल्याचे सांगीतले. त्याचेकडे समर्थ पोलीस
७५-१९
स्टेशनकडील वरील दाखल गुन्हयाचे अनुशंगाने त्यांना विश्वासात घेवुन तपास करता त्याने सांगितले की, माझा मित्र सुरज ठोंबरे, कुणाल पिसाळ व इतर साथिदार असे आम्ही डोके तालीम जवळा नाना पेठ, पुणे येथे ओंकार साळुंके यास कोयत्याने मारहाण करुन, जिवे मारणाचा प्रयत्न केले होता. त्यावेळी मी सुध्दा त्यांचे बरोबर होतो व सदर गुन्हा दाखल झाले पासुन सुमार १ वर्षापासुन मी फरार आहे. असे कबुल केल्याने आरोपीस पुढील कारवाई कामी समर्थ पोलीस स्टेशन, पुणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस कर्मचारी अजय थोरात, अमोल पवार, वैभव स्वामी, अनिल घाडगे, बाबा चंव्हाण यांनी केली आहे.